International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# ग्रामीण अलुतेदारी व बलुतेदारी पध्दतीत झालेले बदल : चिकीत्सक ऐतिहासिक अभ्यास

कु. मनिषा पी. कु-हेकर

आचार्य पदवी संशोधक (इतिहास)
लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ

## प्रस्तावना :

प्राचीन काळापासून आजतागायकत भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतात सुमारे सात लाख खेडी असून भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ८० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहून शेतीसंबंधी विविध कामांवर उपजीविका करणारी आहेत. भारताच्या एकूण उत्पादनापैकी सुमारे ५० टक्के उत्पादन शेतीतून काढले जाते. ग्रामीण भागातील लहानसहान उद्योगधंद्यांमधूनही मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते.

प्राचीन काळापासून चालत आलेल्या श्रध्दा, रूढी, परंपरा, आचारधर्म आणि रितीरिवाज यांचा पगडा आजही आपल्याला ग्रामीण समाजरचनेतील कौटुंबीक जीवनावर आढळतो. आपल्या देशात पाश्चात्य आचारविचार, शिक्षण, नागरीकरण व औद्योगिकीकरण यांच्यामुळे आधुनिकतेचे वातावरण निर्माण झालेले असले तरी भारतीय समाजमनावर अजूनही मध्ययुगीन सांस्कृतिक परंपरांचा पगडा कायम आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनाची वैशिष्ट्ये अभ्यासने आजही महत्वपूर्ण ठरते. ग्रामीण जीवनात अलुतेदारी-बलुतेदारी पध्दतीने फार महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

## बलुतेदारी पध्दती :

प्राचीन काळापासून भारतीय समाज जीवनात जातीव्यवस्थेला फार महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे जातीव्यवस्थेवर आधारीत बलुतेदारी व्यवस्था हे भारतीय समाज जीवनाचे महत्वाचे वैशिष्ट मानले जाते. ऑस्कर लेविस या विचारवंताच्या मते 'या व्यवस्थेमध्ये गावातील प्रत्येक जातीसमुहाकडून अशी अपेक्षा केली जाते की ते दुस-या जातीकुटुंबाची नियोजीत सेवा करतील.' या प्रथेनुसार एका विशिष्ट समुहात राहणा-या विभिन्न जातीच्या लोकांनी इतर जातीची काही प्रामाणिक सेवा करावी व या सेवेच्या मोबदल्यात इतर जातींनी त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करावी. शेती करतो तो शेतकरी पण शेतीची अवजारे इतर साधने तयार करणारे, बिगर शेती कारागीर उदा. सुतार, लोहार, चांभार, कुंभार वैगेरे. ते परस्परांच्या गरजा भागवित आपला उदरनिर्वाह करीत असत. या परस्परावलंबनाच्या भावनेतून बलुतेदारी पध्दती रूढ झाली. उत्तर भारतात या पध्दतीला 'जजमानी' पध्दती म्हणतात.

शेती करतो तो कुणबी व शेतीची कामे न करणारा अडाणी म्हटला जाई. कुणब्याने गाव वसविले व इतरांच्या उदरनिर्वाहाची सोय केली. जे लोक अडाणी म्हणून म्हटले जायचे ते शेतीला पूरक असणारी जी कामे करीत त्यांचीही प्रतवारी ठरविली गेली होती. ज्यांचे कौशल्य, कसब शेतकरी वर्गाला अधिक उपयोगी तो 'कारू' म्हटला जात असे. कारू म्हणजे बलुतेदार व नारू म्हणजे अलुतेदार असे म्हटले जाई. ज्याच्या व्यवसायाविना शेतकरीवर्गाचे फारसे नडत नसे तो नारू समजला जाई. त्या काळात सेवा, वस्तू हेच विनिमयाचे माध्यम होते. शेतकरी वर्गाला अलुतेदार व बलुतेदार वर्षभर उपयोगी पडावयाचे, त्यांच्या गरजा

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

भागवायचे. या मोबदल्यात शेतकरी त्यांना वर्षातून एकदा किंवा दोनदा धान्य रूपाने मोबदला देत असे. या मोबदल्याला बलुता असे म्हणत. बलुत्याचे स्वरूप कामाच्या स्वरूपावर अवलंबून असे. त्यामुळे सुतार, लोहार, चांभार, कुंभार इत्यादी बलुतेदारांना जास्त बलुता मिळत असे.

महाराष्ट्रात बलुतेदारी व्यवस्था रूढ होती, सुतार, लोहार, कुंभार, सोनार, चांभार, न्हावी, परीट, कोळी, महार, मांग, चौगुला व जोशी असे बारा बलुतेदार होते. तर तेली, तांबोळी, साळी, धनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डव-या, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, वाजंत्री, घडसी कलावंत, तराळ, भोई आणि मुल्लानी हे अठरा अलुतेदार होय. बलुतेदारीला जातीव्यवस्थेने स्थैर्य दिले होते. प्रत्येक जातीचा स्वतंत्र असा व्यवसाय होता व तो व्यवसाय करणे प्रत्येकाला बंधनकारक होते. त्याला तो नाकारता येत नसे. बलुतेदारी व्यवस्थेने दीर्घकाळापर्यंत ग्रामीण समुदायाला आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण ठेवले आणि एकमेकांच्या गरजा भागविल्या.

बलुतेदार-अलुतेदार जाती :

बलुता पध्दतीत शेती कसणारे शेतकरी व बिगरशेती व्यवसाय कराणा-या जातीचे लोक हे दोन घटक समाविष्ट आहेत. सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, कुंभार, परीट, न्हावी, कोळी, सोनार, गुरव, ग्रामजोशी ह्या १२ जातीचे लोक तसेच साळी, माळी, तेली, तांबोळी, सनगर, कोष्टी, शिंपी, डवरी, गोंधळी कलावंत, डवरी भाट, गोसावी, मुलाणी, तराळ, भोई, रामोशी ह्या १८ जातीचे लोक आपापल्या जातीचे व्यवसाय करून शेतक-यांचा शेतीच्या, संसाराच्या व अन्य काही गरजांची पूर्तता करीत व त्या मोबदल्यात शेतकरी त्यांना सुगीच्या वेळी त्यांच्या कामाच्या महत्वानुसार पूर्वनिर्धारीत धान्य देई. बारसे, मुंज, विवाह, सण, देवकार्य इत्यादी प्रसंगी काही भेट वस्तू देई. सुतार, लोहार, चांभार इत्यादी १२ जातींना जो मोबदला मिळे त्याला बलुत म्हणत. साळी, माळी, तेली, तांबोळी इत्यादी १८ जातींना मिळणा-या मोबदल्यास अलुत म्हणत. ज्यांना बलुत मिळे त्यांना बलुत्या, बलुतेदार किंवा कारू असे नाव पडले.

ज्यांना अलूत मिळे त्यांना अलुत्या, अलुतेदार किंवा नारू असे नाव पडले. 'बलुतेदारी-अलुतेदारी पध्दती', 'कारू-नारू' असे नाव पडले. बलुता पध्दतीस यजमानी आणि जजमानी पध्दती असेही म्हटले जाते. पूर्वी यज्ञ करणा-या गृहस्थास यजमान किंवा जजमान म्हणत. बलुतेदार-अलुतेदारांना वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळी नावे आहेत. उदा. प्रजा कमीन, पुरजन परधान इत्यादी. महाराष्ट्रात वर नमूद केलेले १२ बलुतेदार व १८ अलुतेदार प्रसिध्द आहेत. अर्थात त्यांच्याशिवाय काही जाती बलुता अलुता पध्दतीत समाविष्ट आहेत. साधारणपणे मोठ्या खेड्यात सर्व प्रमुख बलुतेदार असत. लहान खेड्यात मोजकेच बलुतेदार असत. एखादा बलुतेदार ज्या खेड्यात नसेल ते खेडे शेजारच्या खेड्यातील त्या बलुतेदाराची सेवा घेऊन त्यास बलुत देत असे. एकाच खेड्यात सर्व अलुतेदार आढळत नाहीत. मोठ्या खेड्यात काही अलुतेदार आढळतात. बरेच अलुतेदार भटके जीवन जगतात.

अलुतेदारी - बलुतेदारी पध्दतीतील बदलांची कारणे :

१) औद्योगिकीकरण :

स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकीकरणाची गती वाढली. मोठमोठे उद्योगधंदे निर्माण झाले. उद्योगधंद्यात कामगार भरती ही व्यक्तीच्या जातीऐवजी गुण कौशल्याच्या आधारे होऊ लागली. त्यामुळे बलुतेदार बलुत्याचा त्याग करून उद्योगधंद्यात कामगार म्हणून भरती होऊ लागले. त्यामुळे बलुता पध्दतीस खिंडार पडले.

२) नागरीकरण :

औद्योगिकीकरणा बरोबरच नागरीकरणाचीही गती वाढली. शहरे ही उद्योग, व्यापार, शिक्षण यांची केंद्रे बनली. शहरात बाजारपेठा, बँका, शिक्षण संस्था, शासकीय-निमशासकीय कार्यालये इत्यादी मोठ्या प्रमाणावर निघाली. म्हणजेच शहरात रोजगाराच्या नवनवीन संधी विपुल प्रमाणात उपलब्ध झाल्या. महत्वाचे म्हणजे शहरातील ह्या रोजगारात किंवा व्यवसायात अधिक मान सन्मान, प्रतिष्ठा, वेतन व सोयी सुविधा मिळू लागल्या. त्यामुळे खेड्यातील बलुतेदार-अलुतेदार शहरी व्यवसायाकडे आकर्षित झाले. परिणामी, बलुत्याचा त्याग करून शहराकडे ते नवीन व्यवसायाच्या शोधार्थ स्थलांतर करू लागले. नागरीकरणामुळे बलुता पध्दतीवर मोठा आघात झाला.

३) दळणवळणाची प्रगत साधने :

पूर्वी दळणवळणाच्या साधनाचा, प्रगत साधनांचा अभाव असल्यामुळे ग्रामीण जनतेचा शहरी जीवनाशी फारसा संबंध येत नव्हता. ग्रामीण व्यक्तीला तिची इच्छा असो वा नसो जातीचाच व्यवसाय बलुत्यात करीत खेड्यातच जीवन कंठावे लागे. खेडे सोडून तिला बाहेर जाता येत नसे व नवा व्यवसायही करता येत नसे. म्हणजेच भौगोलिक व व्यावसायिक गतिशीलतेला वाव नसल्याने बलुता पध्दती व्यक्तीला स्विकारावी लागे. आधुनिक काळात दळणवळणाची प्रगत साधने अस्तित्वात आल्याने खेड्यांचा बाह्य जगाशी नित्य व घनिष्ठ संपर्क येऊ लागला. वृत्तपत्रे, मासिके, आकाशवाणी, दूरदर्शन या साधनांमुळे नवीन ज्ञान, विचार, कल्पना, मुल्ये यांची ओळख बलुतेदार जातींना होऊ लागली. त्यामुळे जातीप्रथा व बलुतापध्दती अन्यायकारक आहे याची जाणीव त्यांना झाली. परिणामी त्यांचा त्याग करून खेड्याबाहेर ते स्थलांतर करू लागले. मोटार, रेल्वे इत्यादी वाहतूक साधनांमुळे हे स्थलांतर सुलभ व शक्य झाले. थोडक्यात दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे भौगोलिक व व्यावसायीक गतिशीलतेस चालना मिळाली. त्यामुळेच बलुता पध्दती कोलमडून पडली.

४) शिक्षणप्रसार :

ब्रिटिश राजवटीत शुद्रांसह सर्वांना शिक्षण खुले झाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खेड्यापाड्यातही शिक्षणसंस्था सुरू झाल्या. बलुतेदार – अलुतेदारांची मुले शिकू लागली. त्यामुळे त्यांची अस्मिता जागृत झाली. जातिव्यवस्था व बलुतापध्दती त्यांना अन्यायकारक व गुलामगिरीसारखी वाटू लागली. त्यामुळे शिक्षण घेऊन अधिक सन्मानाचे व्यवसाय मिळविण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले. राखीव जागांच्या तरतुदीमुळे त्यांचे हे प्रयत्न यशस्वी होऊ लागले. थोडक्यात, बलुतेदार जातीत झालेल्या शिक्षणप्रसारामुळे बलुत पध्दतीची पिछेहाट झाली.

५) सुधारणा चळवळी :

ब्रिटीश राजवटीत महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ; आंबेडकर, महर्षी शिंदे इत्यादी समाजसुधारकांनी कनिष्ठ जातींच्या उध्दाराच्या चळवळी सुरू केल्या. त्यामुळे त्यांना आपल्या न्याय हक्कांची जाणीव झाली. त्या हक्काच्या प्राप्तीसाठी त्यांनी संस्था व संघटना स्थापन करून चळवळी सुरू केल्या. त्यामुळे बलुतेदार अलुतेदार जातींच्या ठिकाणी आत्मतेज, आत्मविश्वास, लढाऊ वृत्ती निर्माण झाली. परिणामी, बलुता पध्दतीचे जोखड त्यांना झुगारून देणे शक्य झाले.

६) लोकसंख्या वाढ :

भारतातील वाढत्या लोकसंख्येचा भार शेती व्यवसायावर पडत गेल्याने शेती व्यवसायात सर्वांनाच रोजगार मिळेनासा झाला. बलुतेदारांची संख्या ही वाढल्याने त्यांनाही बलुता पध्दतीत रोजगार मिळणे अवघड झाले. त्यामुळे बेकार झालेले बलुतेदार- अलुतेदार नव्या रोजगाराच्या शोधार्थ गावाबाहेर पडू लागले. परिणामी, बलुता पध्दतीचा -हास होणे अपरिहार्य ठरले.

७) लोकशाही व्यवस्था :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने लोकशाही राज्यपध्दती स्वीकारली. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता या मुल्यांवर आधारलेली समाजव्यवस्था उभारण्यासाठी आवश्यक असणा-या तरतुदी राज्यघटनेत केल्या व सर्व भारतीयांना समान लेखून धर्मभेद, जातिभेद, लिंगभेद, अस्पृश्यतापालन, वेठबिगार प्रथा व अनिष्ट प्रथांचे कायद्याने उच्चाटन केले. तसेच सर्व भारतीयांना व्यवसाय स्वातंत्र्य व देशात कोठेही भ्रमण करण्याचे व वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य राज्यघटनेने दिले. त्यामुळे बलुतेदारांना परंपरागत व्यवसायाचा त्याग करून हव्या त्या ठिकाणी जाऊन हवा तो व्यवसाय करणे शक्य झाले. अशा प्रकारे बलुता पध्दतीतील सक्ती, जबरदस्ती व उच्चनीच्चता कायद्याने संपुष्टात आणल्याने तिचे महत्व कमी झाले.

८) मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव :

आधुनिक काळात मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव सर्वत्र वाढत चालला आहे. उत्पादित माल बाजारपेठेत विकून जास्तीत जास्त नफा मिळविणे हे या अर्थव्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे केवळ पोटासाठी बलुत्यात राबणे हे बलुतेदारांना नकोसे वाटणे स्वाभाविक आहे. म्हणून आपल्या आवडीचा व्यवसाय करून पैसा कमावणे व आपली आर्थिक प्रगती साधने हे त्यांचेही उद्दिष्ट बनले आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेच्या प्रभावामुळे वस्तुविनिमयावर आधारलेली बलुता पध्दती टिकून राहणे अशक्य होते.

अलुतेदारी बलुतेदारी पध्दतीमधील आधुनिक काळातील बदल :

आधुनिक काळात बलुता पध्दतीत अनेक कारणांमुळे परिवर्तन घडून आले आहे, ती मोडकळीस आली आहे. ब्रिटिश राजवटीत भारतीय समाजात औद्योगिकीकरण, नागरीकर या प्रक्रियेमुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा उदय झाला. त्यामुळे वस्तुविनिमय पध्दतीच्या जागी मुद्राप्रधान व्यवस्था आली. शिक्षणप्रसारास सुरूवात झाली. सामाजिक व राजकीय सुधारणांच्या चळवळी सुरू झाल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या सर्व प्रक्रियांची गती दिवसेंदिवस वाढत गेली. त्यामुळे बलुता पध्दतीत पुढील बदल घडून आले.

व्यवसाय स्वातंत्र्य :

बलुता पध्दतीत व्यवसाय स्वातंत्र्य नव्हते. इतर व्यवसाय केल्यास जाती पंचायती शिक्षा करीत. पण आज मात्र भारतीय राज्यघटनेने सर्वांनाच व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य दिल्याने कोणत्याही जातीची व्यक्ती आवश्यक ती पात्रता धारण करून आपल्या आवडीचा व्यवसाय निवडू शकते. जातीचाच व्यवसाय करण्याची सक्ती आज कोणावरही राहिली नाही.

रोख मोबदला :

आपल्याच जातीचा व्यवसाय व्यक्तीने करावा याची सक्ती आज राहिलेली नाही. तरी खेड्यात अनेक बलुतेदार आपल्या जातीचा व्यवसाय करताना दिसतात. आजच्या काळात मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव वाढल्याने ते श्रमाचा मोबदला धान्याऐवजी पैशात घेण्यावर भर देत आहेत.

व्यवसायाचे आधुनिकीकरण :

आज अनेक बलुतेदारांच्या परंपरागत व्यवसायांचे मोठ्या प्रमाणावर आधुनिकीकरण झाले आहे. त्यामुळे त्या व्यवसायाद्वारे पैसा व प्रतिष्ठाही मिळविता येऊ लागली आहे. त्यामुळे लोहार, चांभार, न्हावी, परीट असे बलुतेदार खेड्यात राहून बलुत्यात सेवा देण्याऐवजी शहरात आपापले व्यवसाय आधुनिक पध्दतीने करू लागले आहेत. उदा. खेड्यातील सुतार शहरात येऊन फर्निचर बनवितो, शिंपी टेलरिंगचे दुकान काढतो. त्यामुळे त्यांना कामाचा रोख मोबदला मिळतो. आज पैशाला प्रचंड महत्व आल्याने वरिष्ठ जाती देखील कनिष्ठ जातीचे व्यवसाय करताना दिसतात.

सामाजिक जागृती :

आज कनिष्ठ बलुतेदार जातीतही शिक्षणप्रसार झाल्याने त्यांच्यात वैचारिक व सामाजिक जागृती घडून आली आहे. सुशिक्षित तरूणांना बलुता पध्दती ही गुलामगिरी वाटत आहे. जातीवर आधारलेली उच्चनिचता त्यांना मान्य नाही. त्यामुळे उच्च जातीची सेवा करणे हे त्यांना आपले कर्तव्य वाटत नाही. त्यामुळे त्यांनी बलुता पध्दतीकडे पाठ फिरविली असून आधुनिक अर्थव्यवस्थेत उपलब्ध झालेल्या नवनवीन व्यवसायांचा ते स्विकार करू इच्छितात. अशाप्रकारे, बलुतेदार जातीत झालेल्या जागृतीमुळे बलुता पध्दतीचे अधिष्ठान किंवा पाया उखडला गेला.

शेतीचे आधुनिकीकरण :

परंपरागत समाजात शेती व्यवसाय केंद्रस्थानी ठेवून बलुता पध्दतीची उभारणी केली होती. आज शेतीचे आधुनिकीकरण होऊ लागले आहे. नवनवीन व प्रगत उत्पादन तंत्रे तसेच अवजारे उदयास आली आहेत. त्याची निर्मिती व दुरूस्ती करणे हे परंपरागत बलुतेदारांना शक्य नव्हते.

सारांश :

अलुतेदारी–बलुतेदारी पध्दतीमुळे खेड्यांना आर्थिक स्वयंपूर्णता लाभली होती. शेतकरी धान्योत्पादन करून सर्वांच्या निर्वाहाची सोय करीत. तर अलुतेदार बिगर शेती व्यवसाय करून इतर व्यावसायिकाच्या गरजांची पूर्तता करीत. अलुता-बलुता पध्दती खेड्यात सामाजिक ऐक्य निर्माण करण्यास उपयुक्त ठरली होती. या पध्दतीमुळे व्यक्तीला व्यवसायाची निश्चिती असे. जन्माने जात व जातीवरून व्यवसाय ठरत

असल्याने कोणता व्यवसाय करावा याची चिंता नसे. व्यावसायीक शिक्षण कुटुंबातच मिळण्याची सोय होत असे. जातीचाच व्यवसाय करण्याचे बंधन असल्याने समाजात व्यावसायिक स्पर्धा नव्हती. बलुता पध्दतीत व्यक्तीस सामाजिक संरक्षणही मिळे. बलुतेदाराची कोणतीही अडचण शेतक-याच्या सल्ल्याने सोडविली जाई. असे अनेक गुणवैशिष्ट असले तरी अलुता-बलुता पध्दती कालांतराने व्यक्ती स्वातंत्र्यास मारक ठरली. व्यक्ती विकासा प्रमाणेच आर्थिक विकासासही मारक ठरली. बलुता पध्दती ही यजमान शेतकरी व बलुतेदार यांच्यातील साहचर्यावर व सहकार्यावर आधारलेली होती. परिणामी शेतक-यांनी याचा गैरफायदा घेतला व आपल्यावर आश्रित असलेल्या कनिष्ट बलुतेदार जातींचे शोषण सुरू केले. परिणामी, जाती व्यवसाया संबंधीचे निर्बंध व श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना वाढीस लागली व कालांतराने अलुतेदारी–बलुतेदारी पध्दती संपुष्टात आली. स्वातंत्रपूर्व काळात बलुतेदारीवर ग्रामीण अर्थव्यवस्था अवलंबून होती. इंग्रजी राजवटीचा या अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊन नवविचाराचे वारे वाहू लागले. या परिवर्तनाचा परिणाम ग्रामीण लोकांवर झाला. शहरीकरण, औद्योगिकीकरण, शिक्षणाचा विकास यामुळे ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक, कौटुंबीक, शैक्षणिक स्थिती बदलू लागली व अलुतेदारी आणि बलुतेदारी पध्दतीत बदल घडून आले.

संदर्भ ग्रंथसूची :

१) भोसले, डॉ. दत्ता, 'लोकसंस्कृती : बंध-अनुबंध', पद्मगंधा प्रकाशन, पुणे
२) गद्रे, डॉ. प्रभाकर, 'विदर्भात संक्रमण काळ – सामाजिक आर्थिक अभ्यास (१८०३-१८५३)', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
३) खरात, शंकरराव, 'गावाचे अलुतेदार आणि बलुतेदार', इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे
४) शंकर, सखाराम, 'बलुतेदार', मॅजिस्टिक प्रकाशन, पुणे
५) लुलेकर, डॉ. प्रल्हाद, 'बलुतेदारांची हत्यारे आणि अवजारे', पद्मगंधा प्रकाशन, पुणे